# 9 फेब्रुवारी

**आजचा सुविचार :**

"टीका करणाऱ्या शत्रुंपेक्षा दिखाऊ स्तुती करणाऱ्या मित्रांपासून सावध रहा."

**आजचे पंचांग :**

वार – बुधवार मास - माघ नक्षत्र – कृतिका

सूर्योदय – सकाळी 7.02 वाजता सूर्यास्त – सायंकाळी 6.33 वाजता

**आजचे दिनविशेष :**

1. 1933 ला आजच्या दिवशी साने गुरुजी यांनी नाशिकच्या तुरुंगात श्यामची आई पुस्तक लिहिण्यास सुरुवात केली.

2.1951 ला आजच्या दिवशी स्वतंत्र भारताची जनगणना करण्यासाठी सूची तयार करण्यात आली.

3. 2008 ला कुष्ठरुग्णांसाठी आपले जीवन खचित करणारे समाजसेवक बाबा आमटे यांचे निधन.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1) Half – अर्धा 2) Grow - वाढणे 3) Guest – अतिथी 4) Habit – सवय

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) तुमच्या गावाचे/ शहराचे थोडक्यात वर्णन करा. 2) 1 कि.मी. म्हणजे किती मीटर?

3) सकाळच्या सूर्यप्रकाशात उभे राहिल्याने आपल्याला कोणते जीवनसत्व मिळते?

4) विजेच्या दिव्यात कोणत्या धातूची तार वापरतात?

**बोधकथा :**

## गुरूचे महत्व

जीवनात गुरू का करायचा हे कळावे लागते. तसेच गुरूला शिष्यही कळावा लागतो. अनेक गोष्टी कळलेल्या असतात पण त्या वळत नाहीत. पिता हा गुरू असतो आपल्याला गुरू उपासना देतात. ते का देतात ते कळाले पाहिजे. उपासना घेण्यापूर्वी आपण किती कामे केली व उपासना घेतल्यावर आपले किती काम पूर्ण झाले हे उपासना घेतल्यावरच कळते. जीवनात प्रगतीसाठी माहिती असावी लागते. माणूस वर चढताना इरांवरून खाली घसरू नये ही ताकद गुरू देतात पण चढताना गुरू पुढे असतात म्हणून गुरूच्या मागे राहून गुरू प्रमाणे आचरण करणे ही कला आहे. आपल्या आई वडीलांना न दिसणारा देह होतो. देहाचे भान न विसरणारा आनंदाचा विषय आहे आई वडील कळणे हा ज्ञानाचा विषय आहे. आई वडील एवढेच गुरूचे स्थान महत्वाचे आहे.

गुरू कळणे हा शिष्यभाव आहे. गुरूने दिलेले ज्ञान महत्वाचे आहे. आपण गुरूला न विसरले पाहिजे तीच खरी जागृती आहे व तिथे अष्टभाव निर्माण होतो. गुरू ही महत्वाची देवता आहे. ग्रंथातून ज्ञान मिळते पण ज्ञान झाले म्हणजे

विद्या प्राप्त होत नाही. जीवनात गुरूत्व पत्कारावा लागतो. मोठ्या भावाने लहान भावाला गुरू करणे अवघड काम आहे. गुरू शिष्याचा भाव कळण्यासाठी ज्ञानेश्वरीचा अभ्यास पाहिजे. स्तुती गुरूची होते व प्रगती शिष्याची होते गुरू केला तरी गुरू कळला पाहिजे शिष्याच्या प्रश्नाची उत्तरे देण्याची ताकद गुरूमधे पाहिजे. गुरूने सांगितलेले कळायला पाहिजे. गुरू कळल्याशिवाय पुढचा मार्ग मोकळा होत नाही. शिष्यभाव सुटू शकतो पण गुरूभाव सुटू शकत नाही. गुरू कळला नाही म्हणजे आधोगती. गुरूत्वात सामर्थ्य आहे हे शिष्याला कळले पाहिजे आपला इतिहास कळला पाहिजे पूर्वत्वाचा अभ्यास केला तर गुरू कळला पाहिजे व जे कळतो त्यातून अहंकार वाढु नये गुरूची लक्ष्मणरेषा ओलांडू नये. ज्ञानामुळे विद्या प्राप्त होते.

त्यासाठी ज्ञान हे महत्वाचे आहे. विद्येचा अभ्यास असला तरच गुरू कळते. कळले ते वळले पाहिजे व वळलेले कळणे ही विद्या आहे. ही देहात्मक बुध्दी आहे, विद्येचा मार्ग कठीण आहे. उपनिषद हे गुरूकडून हाताळलेले पाहिजे. कोणतेही मिळणे व ती मिळून टाकणे म्हणजे अस्मिता ही शुन्याकडे नेता आली पाहिजे. पुरूषार्थ करून विद्या मिळावी लागते व त्याचा उपयोग दुसऱ्याला देणे ही गुरूकृपा आहे. गुरू भेटल्यावर उपासना केल्याचे सांगावे. आत्मशोध करून आत्मज्ञान करून घ्यावे लागते. आपण खरच गुरूचे ऐकुण शिष्यभाव पाहून शिष्यत्व पत्कारले आहे का? शिष्यभाव नसणाऱ्याच्या पदरात विद्या टाकली तर गुरूला शिक्षा होते. शिष्यातला खरा विषय म्हणजे त्याच्या जवळ शिष्यभाव असावा लागतो तसेच स्वभाव तयार होतो. आपल्या अस्मितेला किती भाव घ्यायचा ही ज्ञानाची खरी पायरी आहे. मी पणाची जाणीव ही अस्मितेची पहीली पायरी आहे व अस्मितेला भाव द्यायला शिकणे ही शेवटची पायरी आहे. स्वभाव भाव हा अस्मितेचा भाव आहे. विज्ञान म्हणजे ज्ञान आहे पण बुध्दीने विज्ञान प्राप्त होते. जीवनात गुरूला ज्ञान देण्यासाठी कठोर व्हावे लागते. गुरूचे महत्व विद्येमुळे येते.